सुकुमार
शिदोरे

# जुनी गाणी आणि नव्या रॉयल्टीज्

वीस जानेवारी २०१७च्या 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये राजीव शुक्ल यांचा 'Play the new copyright act' या शीर्षकाचा लेख प्रकाशित झाला. त्यात त्यांनी संगीतकार, गीतकार व पार्श्वगायकांना रॉयलटीज पासून वंचित ठेवण्याचा म्युझिक कंपन्यांवर आरोप करून त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. २०१२साली कॉपीराईट कायद्यात दुरुस्त्या होऊनही या मंडळींना अद्याप जुन्या गाण्यांच्या रॉयल्टीज् मिळालेल्या नाहीत, आणि या सगळ्या अन्यायाला संगीत (रेकॉर्डिंग) कंपन्या जबाबदार आहेत असा शुक्लांच्या लेखाचा सूर होता. राजीव शुक्लांना चित्रपट व संगीत उद्योगातील प्रथा व कायद्यातील तरतुदी यांचे अपुरे ज्ञान असल्याने त्यांनी हा लेख लिहिला असा माझा समज झाला. त्यांच्या लेखाला प्रतिसाद म्हणून मी "Playing the wrong notes' अशा शीर्षकाचा लेख लिहिला. तो अति दीर्घ झाल्याने संपादक महाशयांनी माझ्या संमतीने काहीसा संपादित केला, व २५ फेब्रुवारी २०१७च्या 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये प्रकाशित केला. आत्ताच्या या लिखाणात मी त्या दोन्ही लेखांचा सारांश देणार नसून राजीव शुक्लांच्या लेखातील मला खटकलेले मुद्दे व त्यावरील माझे भाष्य थोडक्यात सादर करणार आहे.

(१) 'आयेगा आनेवाला' – हा एक लहानसा मुद्दा आहे, जो माझ्या पूर्व– प्रकाशित इंग्लिश लेखात शब्दमर्यादेमुळे समाविष्ट होऊ शकला नाही – फक्त 'वाटसरू'चे वाचक वाचत आहेत. शुक्लांच्या म्हणण्यानुसार 'आयेगा आनेवाला' या १९४८

लेखक सांगीतिक क्षेत्राचे अभ्यासक आहेत.
ईमेल sukumarshidore@gmail.com

सालातील ‘महल’ चित्रपटातील गाण्याबद्दल लता मंगेशकर यांना प्रॉमिस केलेले चारशे रुपये अजून मिळाले नाहीत. यावर माझे म्हणणे एवढेच आहे की पार्श्वगायक जेव्हा चित्रपटात समाविष्ट करण्यास्तव गाणे सादर करतो तेव्हा त्याचा करार चित्रपट-निर्मात्याशी असतो (रेकॉर्ड कंपनीशी नव्हे). तेव्हा लताबाईंना चारशे रुपयांच्या बिदागीचे प्रॉमिस जर कोणी दिले असेल तर ते चित्रपट-निर्मात्यानेच दिले असावे. (‘महल’ हा चित्रपट बॉम्बे टॉकीजने निर्माण केला होता). आता, चारशे रुपयांकरिता कोणताही फिल्म - प्रोड्युसर पार्श्वगायिकेला सुमारे सत्तर वर्षे चुकवत राहील, अशा स्वरूपाचा आरोप पटण्यासारखा नाही. शुक्ला यांनी वस्तुस्थिती पुन्हा तपासली तर बरे होईल!

(२) जुन्या गाण्यांच्या रॉयल्टीज् - शुक्ल यांचा रोख स्पष्ट आहे. त्यांच्या मते, म्युझिक कंपन्या या खलनायक/खलनायिका असून त्या गीतकार, संगीतकार व पार्श्वगायक/गायिका या सगळ्यांचेच नुकसान करीत आहेत. शुक्ल यांनी असे विचार व्यक्त केल्यामुळे निदान जुन्या गाण्यांच्या संदर्भात चित्रपट व संगीत उद्योगातील प्रथा त्यांच्या लक्षात आणून देणे मला आवश्यक वाटले. सगळे जाणतात की चित्रपट-निर्मितीच्या प्रक्रियेत सर्वात महत्वाचा घटक चित्रपट-निर्माता असतो. तोच कथालेखक, स्क्रिप्ट/डायलॉग रायटर, दिग्दर्शक, संगीतकार, कॅमेरामन, गीतकार, आर्ट डायरेक्टर, पार्श्वगायक/गायिका, तंत्रज्ञ इत्यादींना एंगेज करतो -तो या सगळ्यांना बिदागी देतो, तो चित्रपट निर्मितीसाठी भांडवल गुंतवून आर्थिक धोका पत्करतो. कायद्याप्रमाणे तोच चित्रपटाच्या कॉपीराइटचाही मालक असतो. चित्रपटाच्या गाण्यांच्या व संवादांच्या ध्वनिमुद्रिका काढून त्या विकण्याचे अधिकार संगीत कंपन्या चित्रपट निर्मात्याशी करार करून प्राप्त करतात व त्या बदल्यात चित्रपट निर्मात्याला रॉयल्टीज् देतात. चित्रपटाचे गीतकार/संगीतकार/पार्श्वगायक यांच्याशी म्युझिक कंपन्यांचे करार नसतात. आता, जर का एखाद्या निर्मात्याने त्याला म्युझिक कंपनीकडून मिळणाऱ्या रॉयल्टीचा काही भाग एखाद्या संगीतकार किंवा पार्श्वगायकाकडे वळवण्याचे ठरवले, तर निर्मात्याचा तो निर्णय कार्यान्वित करण्यासाठी त्याच्या रॉयल्टीचा काही भाग त्या व्यक्तीकडे वळवून म्युझिक कंपनी निर्मात्याला मदत करू शकेल. तथापि चित्रपटाचे गीतकार/संगीतकार/ पार्श्वगायक यांना म्युझिक कंपन्यांनी रॉयल्टीज् देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ती जबाबदारी सर्वस्वी चित्रपट निर्मात्याची असते (अर्थात, म्युझिक कंपन्या स्वतः ज्या गैर-फिल्मी रेकॉर्डस् काढतात, त्यांच्याबाबत सगळ्या संबंधित व्यक्तींची बिदागी किंवा रॉयल्टीज् करारानुसार देण्याची जबाबदारी म्युझिक कंपन्यांची असते,

*२०१२मध्ये मनमोहनसिंग सरकारने कॉपीराईट ॲक्ट, १९५७मध्ये मोठे बदल केले. त्याद्वारे म्युझिक कंपन्या आणि फिल्म निर्माते सिनेमागीतांच्या सातत्यपूर्ण प्रसारणामधून जे पैसे कमावतात त्यातील काही भाग एका निधीकडे वळवला जाईल ज्यातून गीतकार, गायक आणि संगीतकार यांना नियमितपणे पैसे मिळत जातील असे ठरले.*

*काँग्रेसचे माजी खासदार राजीव शुक्ल अलीकडेच लता मंगेशकर यांना भेटले असताना लताबाईंनी या कायद्याचा त्यांना काहीच फायदा झाला नसल्याचे सांगितले. त्यामुळे व्यथित होऊन शुक्ल यांनी इंडियन एक्सप्रेसमध्ये लेख लिहिला. त्या लेखाचा सुयोग्य प्रतिवाद इंडियन म्युझिक इंडस्ट्रीचे माजी महासचिव आणि फोनोग्राफीक परफॉर्मन्स लिमिटेडचे माजी संचालक व सचिव तसेच वाटसरूचे लेखक सुकुमार शिदोरे यांनी केला. वाटसरूच्या वाचक त्यांच्या या लेखाचे नक्की स्वागत करतील!*

**- संपादक**

यात शंका नाही. पण राजीव शुक्ल यांचा लेख जुन्या चित्रपट गीतांच्या संदर्भात आहे, हे महत्वाचे.).

(३) कॉपीराईट कायद्यातील २०१२ सालच्या सुधारणा : आपल्या देशात कॉपीराईट संकल्पनेचा अंमल शंभराहून जास्त वर्षांपूर्वी सुरू झाला. या क्षेत्रातील पहिला कायदा म्हणजे इंडियन कॉपीराईट ॲक्ट, १९१४. स्वातंत्र्योत्तर काळात कॉपीराईट ॲक्ट १९५७ पारित करून आपल्या सरकारने एक क्रांतिकारी पाऊल उचलले. आत्तापर्यंत या कायद्यात सहा वेळा फेरबदल करण्यात आले आहेत. अलीकडचे बदल २०१२ साली करण्यात आले, जे २०१३ पासून लागू झाले आहेत. २०१२ सालचे हे फेरबदल करण्याचे श्रेय जावेद अख्तर यांनी राज्यसभेत दिलेल्या एका भाषणाला देण्याची आजकाल एक फॅशन झाली आहे. पण तसे म्हणणे बरोबर नाही. वास्तविक, या सुधारण्या करण्याकरिता प्रमुख चालना WIPO (World Intellectual Property Organisation) या आंतरराष्ट्रीय संस्थेने १९९६ साली जिनेव्हा येथील डिप्लोमाटिक कॉन्फरन्समध्ये संमत केलेल्या दोन आंतरराष्ट्रीय करारांमुळे (Treatiesमुळे ) मिळाली. या कराराची नावे आहेत : (i) WIPO Copyright Treaty, (WPT) आणि (ii) WIPO Performances and Phonograms Treaty (WPPT). या दोन्ही करारांचा उद्देश इंटरनेटच्या व डिजिटल युगात कॉपीराईट धारकांच्या अधिकारांची अंमलबजावणी सुलभतेने करता यावी, कॉपीराईट व्यवस्थापनातील तांत्रिक अडथळ्यांवर मात करता यावी आणि त्यासाठी आवश्यक अशी कायदेशीर प्रावधाने सगळ्या देशांनी अमलात आणावीत, हा होता. शिवाय, WPPTचा एक महत्त्वपूर्ण अतिरिक्त उद्देशही होता – तो म्हणजे ध्वनिमुद्रिकांचे निर्माते आणि परफॉर्मर्स (गायक, गायिका, वादक) यांच्या अधिकारांमध्ये व्यापक जनहिताच्या संदर्भात संतुलन साधले जावे. आपल्या कायद्यातील २०१२ सालच्या सुधारणा या करारांना सुसंगत आहेत. अर्थात परफॉर्मर्सचे अधिकार वाढविण्यात आले आहेत. शिवाय, या आंतरराष्ट्रीय करारांमध्ये नसलेल्या आणखीही काही सुधारणा आपण केल्या आहेत. उदाहरणार्थ, गीतकार व संगीतकार यांचे अधिकार अधिक मजबूत केले आहेत. (जाता जाता : WIPOच्या डिप्लोमॅटिक कॉन्फरन्सला रेकॉर्डिंग इंडस्ट्रीच्या आंतर-राष्ट्रीय संघटनेच्या प्रतिनिधि-मंडळाचा सभासद म्हणून मीही हजर होतो.)

या कॉपीराईट सुधारणांच्या अंतर्गत लता मंगेशकर यांना अद्याप काहीही प्राप्ती झाली नाही, असे शुक्ला यांना खुद्द लताबाईंकडून कळले व त्या वेळी केंद्रीय मंत्री अरुण जेटलीही तेथे हजर होते, असे शुक्ल म्हणतात. जेटलींनी आश्वासन दिले की नव्या सुधारणा लवकरच अमलात येतील. लताबाईंशी झालेल्या संभाषणाचा हा गोषवारा शुक्लांनीच आपल्या लेखात दिला आहे. म्हणजेच नव्या सुधारित कायद्यान्वये जुन्या गाण्यांच्या जुन्या पार्श्वगायकांना खूपसा आर्थिक फायदा होईल असा गायकांचा व शुक्लांचा समज आहे, असे दिसून येते. माझे मत मात्र जरासे वेगळे आहे. मला असे वाटते की या नव्या सुधारणांमुळे जुन्या पार्श्वगायकांना फारसा फायदा मिळणार नाही. एक लक्षणीय बाब म्हणजे २०१२च्या दुरुस्त्यांच्या आधी व नंतरही गायक- गायिकांना कायद्याने कॉपीराईट दिलेला नसून त्यांच्या विवक्षित सादरीकरणाबाबत काही विशेषाधिकार बहाल केले आहेत. २०१२च्या आधीच्या प्रावधानांनुसार चित्रपटाकरिता गाणे सादर केल्यास गायक-गायिकांचे हे अधिकार लुप्त होत असत. चित्रपट-निर्माता भांडवल गुंतवीत असल्यामुळे त्याला मदत करण्यासाठी ही तरतूद होती हे उघड आहे. आता मात्र कायदा गायकांच्या बाजूने काहीसा सुधरवण्यात

आला आहे. त्यांचे अधिकार वाढले आहेत. त्याचे पर्यवसान २०१३ साली गायक-गायिकांची एक संघटना स्थापन होण्यात झाले आहे. या संघटनेचे नाव आहे 'इंडियन सिंगर्स राईट्स असोसिएशन'. २०१२च्या सुधारणा २०१३मध्ये अमलात आल्या - त्यानंतरचे पर्फोमन्सेस सुधारित कायद्याच्या कक्षेत येतील, आणि ही नवी संघटना गायक- गायिकांच्या सामायिक अधिकारांचे रक्षण करून त्यांना उत्पन्न मिळवून देईल, अशी आपण अपेक्षा करू शकतो. तथापि, लताबाईंसारख्या वरिष्ठ गायक-गायिका २०१३नंतर चित्रपटांकरिता फारसे गायन करीत नाहीत असे आपण गृहीत धरल्यास त्यांना सुधारित कायद्याचा फारसा फायदा होण्याची शक्यता नाही. मात्र, त्यांची अपेक्षा जर रेडिओ आणि सार्वजनिक ठिकाणी वाजवल्या जाणाऱ्या त्यांच्या आवाजातील जुन्या गाण्यांपासून रॉयल्टी मिळेल अशी असेल तर तशा त्यांच्या मागणीला जोरदार हरकत घेतली जाऊ शकते, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. एक तर ज्या काळात ती जुनी चित्रपटगीते चित्रपटांमध्ये समाविष्ट केली गेली त्या काळात गायक-गायिकांचे सगळे अधिकार चित्रपट-निर्मात्याच्याच मालकीचे होत असत. आता २०१३नंतर अकस्मातपणे जुन्या गाण्यांमधले ते अधिकार पार्श्वगायकांकरिता उकरून कसे काढता येतील? दुसरी गोष्ट म्हणजे त्या काळात परफॉर्मर्स (ज्या संज्ञेत गायक-गायिकांचाही समावेश होतो)च्या कॉपीराईटची मुदत केवळ पंचवीस वर्षे होती. तो मर्यादित कालावधी त्या जुन्या गाण्याबाबत केव्हाच संपला आहे. याचा अर्थ असा की परफॉर्मर्सना त्या जुन्या गाण्यात अधिकार होते असे आपण क्षणभर जरी मानले तरी ते परफॉर्मन्सेस पंचवीस वर्षांहून जास्त कालावधी लोटल्यामुळे केव्हाच जनतेच्या मालकीचे झाले आहेत. तेव्हा या परीस्थितीत जुन्या गाण्यांच्या जुन्या पार्श्वगायकांना किंवा त्यांच्या वारसांना कितपत आर्थिक फायदा होईल, याबद्दल मला दाट शंका वाटते.

(४) गीतकार/ संगीतकारांच्या रॉयल्टीज् : गीतकार/ संगीतकार चित्रपट-निर्मात्यांकडून आपली बिदागी आधीच वसूल करतात, किंवा तसे त्यांनी केले पाहिजे, हे आपण पाहिले. याशिवाय, त्यांच्या गाण्यांच्या सार्वजनिक सादरीकरणाबद्दल ते आपल्या संघटनेमार्फत रॉयल्टी गोळा करतात - आणि ही जुनी प्रथा आहे. आपल्या कायद्यानेच अशा संघटना म्हणजे कॉपीराईट सोसायटीज स्थापन करून त्या केंद्र सरकारकडे पंजीकृत करण्याची तरतूद पूर्वीपासूनच केली आहे. गीतकार व संगीतकारांच्या अशा संस्थेचे नाव आहे इंडियन परफॉर्मिंग राईट्स सोसायटी (IPRS), जी १९६९ साली स्थापन झाली. (मात्र, देशात सर्वप्रथम कॉपीराईट सोसायटी स्थापित करण्याचे श्रेय म्युझिक (रेकॉर्डिंग) इंडस्ट्रीला दिले पाहिजे. ध्वनिमुद्रिकांच्या ब्रॉडकास्टिंगकरीता व सार्वजनिक प्रसंगी/ ठिकाणी वापर करण्यास्तव लायसन्सेस देणारी रेकॉर्डिंग उद्योगाची फोनोग्राफीक परफॉर्मन्स लिमिटेड नामक ही संस्था १९४१ साली स्थापन झाली. रेकॉर्ड प्रोड्युसर्सना म्हणजे म्युझिक कंपन्यांना त्यांच्या रेकॉर्डिंग्समध्ये स्वतंत्र कॉपीराईट कायद्यानेच दिलेला आहे, हे सर्व जाणतातच.) २०१२च्या कायद्यातील दुरुस्तीच्या आधीपासूनच गीतकार/ संगीतकार - IPRS या संस्थेमार्फत - त्यांच्या गीतांच्या सार्वजनिक सादरीकरणापासूनचे उत्पन्न कमावत आहेत. (अलीकडे संगीत-प्रकाशक या गटात IPRS ही संस्था म्युझिक कंपन्यांनाही सभासदत्व देऊ लागली आहे.) अशी परिस्थिती असताना गीतकार/संगीतकार यांच्या अधिकारांवर रेकॉर्ड कंपन्या कशा प्रकारे गदा आणताहेत, याचा काहीच खुलासा न करता शुक्ल तसा आरोप करून मोकळे झाले आहेत.

(५) कलाकारांच्या लोकप्रियतेसाठी रेकॉर्डिंग कंपन्यांचा हातभार - शुक्ल यांच्या मते गीतकार/

संगीतकार/ पार्श्वगायक लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे ऑल इंडिया रेडिओ, विविध भारती आणि रेडिओ सिलोन. पूर्णविराम! या संदर्भात म्युझिक उद्योगाचा उल्लेखदेखील त्यांनी केलेला नाही. माझ्या मते जुने फिल्म संगीत व गीतकार/संगीतकार/ पार्श्वगायक लोकप्रिय करण्यामध्ये रेकॉर्डिंग इंडस्ट्रीचा फार मोठा हातभार लागला आहे. रेडिओ आणि प्रमुखतः HMV या जुन्या म्युझिक कंपनीच्या ध्वनिमुद्रिका यांच्यामुळे फिल्म-संगीत व सर्व संबंधित कलाकार लोकप्रिय झाले एवढेच नाही, तर ते संगीत टिकवण्याचे कार्यही ऑल इंडिया रेडिओ आणि HMVमुळे पार पडले आहे.

(६) परफॉर्मर कोण? : आपल्या कायद्यातील परफॉमरची व्याख्या पुरेशी व्यापक आहे. त्यात गायकच नव्हे तर वादक, नट, नर्तक, डोंबारी, कसरत करणारा, जादूगार, हातचलाखीचे प्रयोग करणारा, गारुडी, वक्ता किंवा भाषण देणारा, किंवा कोणतेही सादरीकरण (परफॉर्मन्स) करणारा – या सगळ्यांचा समावेश होतो. आपापले सामायिक हितसंबंध जपण्यासाठी व त्यायोगे कला-वृद्धी करण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील परफॉर्मर्सनी त्यांच्या संघटना स्थापन करण्याचा विचार केला पाहिजे. अशा संघटनांना आता कॉपीराईट कायद्याचे पाठबळ मिळू शकते. आम जनतेकरिता एखाद्या गायकाइतकाच एखादा जादूगारही महत्वाचा असतो – त्याची कलाही कलाच असते! त्यालाही आपली उन्नती साधायची असते. आजमितीस, माझ्या अपेक्षेप्रमाणे, वादक व नट-नट्यांच्या संघटना नजीकच्या काळात स्थापित होऊ शकतील. अर्थात, लेट अस वेट अँड वॉच! ●

---

**(प्रशांत खुंटे, पान २३ वरून)**

आहे. समाजाने कोंडी केली म्हणून मेहतर समाज या कामात गुंतला आहे. पण आता यापुढे आम्ही हे काम करणार नाही,' असं वैशाली ठामपणे सांगते. लहानपणीही तिची हीच भावना होती. पण आता त्या भावनेला मानवतेच्या शास्त्रकाट्याची कसोटी प्राप्त झाली आहे. अध्यात्मिक मुक्तीची भावना व्यक्त करणारा तुकारामांचा एक अभंग आहे – 'मीचि मज व्यालो, पोटा आपुलिया आलो...' वैशालीची भावना यापेक्षा काय वेगळी आहे? तिने सफाई कामगारांच्या मुक्तीची भाषा सुरू केली आहे. 'स्वच्छ भारता'चं स्वप्न साकारताना आपल्याला तिच्यासारख्या अनेकांची मुक्ती करावी लागणार आहे. ●

(अनुभव मासिकाच्या दिवाळी अंक २०१६ मधून साभार पुनर्मुद्रित.)

'परिवर्तनाचा वाटसरू'मध्ये प्रसिद्धीसाठी पाठवलेल्या लेखांचे स्वागत आहे.

संपादनाच्या सोयीसाठी प्रकाशनासाठी पाठवलेले लेख सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख युनिकोड अथवा श्रीलिपी ७ च्या श्री-देव७-०७०८ या फाँटमध्ये पाठवावा.

**वाटसरूचा नवीन पत्ता**

द्वारा **प्रशांत खुंटे**
वॉर्ड क्र. ५/ घ. क्र. ६२, बौद्धविहाराजवळ,
गणेशनगर, येरवडा, पुणे ४११००६
भ्र. ७७७६९०२२६७